ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

Reg. No. B. 5114. Licence No. 53.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT

वर्ष ३० | पुणें, बुधवार, १६ सप्टेंबर, १९६४ | अंक १८

## विविध माहिती

**खंबायतच्या समुद्रांतील तेल**—खंबायतच्या किनाऱ्या-जवळ समुद्रांतील तेलाचा शोध लावण्यासाठी भारताच्या तेल व नैसर्गिक वायु मंडळानें टेंडर्स मागविलीं आहेत. समुद्राच्या खोलींत तेल शोधण्याचें हें काम बहुधा इ. एन. आय. ह्या इटालिअन कंपनीलाच मिळेल. परंतु इतर परदेशीय कंपन्यांच्या सहकार्याचाहि विचार करण्यांत येत आहे.

**कागदाचा सहकारी कारखाना**—सांगली येथें १२ कोटी रुपये भांडवल लागणारा सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारा एक कारखाना काढण्याचे प्रयत्न चालू आहेत. ह्या कामीं सांगली भागांतील ४ सहकारी साखर कारखाने भाग घेत आहेत. उसाच्या चिपाडापासून कागद तयार करणाऱ्या कारखान्यांची यंत्रसामग्री पाहून येण्यासाठी एक मंडळ युरोप व अमेरिकेला जाणार आहे.

**शस्त्रास्त्रांच्या कारखान्याची तयारी**—तिरुचिरापल्ली येथें ८ कोटी रुपये खर्चून शस्त्रास्त्रें तयार करण्याचा जो कारखाना काढण्यांत यावयाचा आहे, त्याला पूरक असणाऱ्या नागरी कामा-साठी भारत सरकारनें ३ कोटी रुपये मंजूर केले आहेत. देशांत काढण्यांत येणाऱ्या सहा शस्त्रास्त्रांच्या कारखान्यांपैकीं हा एक आहे. तिरुचिरापल्लीपासून ११ मैलांवर कारखान्यासाठी २ हजार एकर जमीन मिळविण्यांत आली आहे. कारखान्याला पाणी पुर-वठा करण्यासाठी ५० लाख रुपयांची योजना आखण्यांत आली आहे.

**हिंदुकुश पर्वतांतून मोटाररस्ता**—सोव्हिएट रशिआच्या मदतीनें अफगाणिस्तानच्या सरकारनें हिंदुकुश पर्वताच्या रांगेंतून जाणारा १०७ किलोमीटर लांबीचा मोटारीचा रस्ता बांधला आहे. रशिअन तंत्रज्ञांच्या मदतीनें परदेशांत बांधण्यांत आलेला हा पहिलाच रस्ता आहे. रशिअन तंत्रज्ञ अफगाणिस्तानांत आणखी एक आणि इंडोनेशिआंत तीन मोटाररस्ते बांधण्याच्या कामीं साह्य करीत आहेत.

**तांब्याच्या निर्मितीचा प्रकल्प**—भारत सरकारचें भूगर्भ-पाहणीखातें गुंतूर जिल्ह्यांत दरसाल २ हजार ते ३ हजार टन तांबें निर्माण करूं शकणाऱ्या एका प्रकल्पाची पाहणी करीत आहे. ह्या कामासाठी ४थ्या कार्यक्रमांत १ कोटी रुपयांची तरतूद कर-ण्यांत येणार आहे. गुंतूर जिल्ह्यांत दोन किंवा तीन विभागांत तांब्याचें खनिज सांपडण्याची शक्यता आहे. तांब्याच्या खनि-जाची प्रतहि चांगली असल्याचें सांगण्यांत येत आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत १,३८,००० टन तांब्याची गरज लागणार आहे. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत २,५०,००० टन तांब्याची गरज लागेल असा अंदाज करण्यांत आला आहे.

**मोठा हिरा सांपडला**—मध्यप्रदेशांतील पन्ना येथील हिऱ्यां-च्या खाणींत १६·९ कॅरेट वजनाचा मोठा हिरा सांपडला आहे. ह्या हिऱ्याची किंमत १ लाख रुपयांपर्यंत होईल. त्याचा लवकरच लिलांव करण्यांत येणार आहे. १९६१ मध्यें ह्याच खाणींत विजय ह्या नांवाचा एक मोठा हिरा सांपडला होता. त्याची किंमत ५ लाख रुपये झाली होती.

**लष्कराची वैद्यकीय मदत**—काश्मीरमध्यें असलेल्या लष्करांतील डॉक्टर्स स्थानिक लोकांना वैद्यकीय मदत करीत आहेत. आतांपर्यंत सुमारें ८,००० रोग्यांची तपासणी करून त्यांच्यावर उपचार करण्यांत आले आहेत. वैद्यकीय मदतीच्या योजनेप्रमाणें हिंदी लष्कर डॉक्टर्स पुरवितें आणि काश्मीरचें सर-कार औषधें व कंपौंडर्स पुरवितें. वैद्यकीय मदत देण्याचा उपक्रम जम्मू व काश्मीरमध्यें प्रथम सुरू झाला. आतां हाच उपक्रम लडाख भागांतहि चालू करण्यांत येणार आहे.

**हंगेरीमधील आत्महत्यांचें प्रमाण**—संयुक्त राष्ट्र संघटनेच्या लोकसंख्याविषयक वार्षिकांत प्रसिद्ध करण्यांत आलेल्या माहिती-प्रमाणें हंगेरी देशांत आत्महत्या करणाऱ्यांचें प्रमाण सर्वांत अधिक आहे. त्या देशांत दर १ लाख लोकांमागें २४·९ इतके लोक आत्महत्या करतात. हंगेरीच्या खालोखाल ऑस्ट्रिआ २२·४; फिनलंड २२·१; झेकोस्लोव्हाकिआ २०·६; पश्चिम जर्मनी १८·७; स्विट्झरलंड १८·२; जपान १७·३; स्वीडन १६·९ असे अनुक्रम लागतात.

**जड पाण्याचा कारखाना**—चौथ्या पंचवार्षिक कार्य-क्रमाच्या अखेरीस मद्रास येथें जड पाणी उत्पादन करणारा एक कारखाना उभारण्यांत येणार आहे. अणुभट्टी चालविण्यासाठी ह्या पाण्याचा उपयोग करावा लागतो. मुंबईजवळील ट्रॉम्बे येथील 'अप्सरा' ह्या अणुभट्टीसाठी लागणारें जड पाणी सध्यां भाक्रा-नान्गल येथील कारखान्यांत उत्पादन केलें जातें. त्यापूर्वी जड पाण्याची आयात करण्यांत येत असे आणि त्यासाठी १ टन पाण्यामागें ३ लाख रुपये यावे लागत असत.

**कलकत्त्यांतील अफवेचा प्रताप**—गेल्या महिन्यांत कल-कत्त्यांत मिठाची टंचाई पडणार अशी अफवा उठली त्यामुळें तेथील नागरिकांची धावपळ उडाली. वास्तविक कलकत्त्यामधील उद्योगधंद्यांना व घरगुती वापरासाठी मिळून दरमहा १० हजार टन मीठ पुरतें. सरकारी गुदामांत ५१ हजार टनांचा सांठाहि होता. पण अफवेच्या पायीं मिठाची किंमत १२ पैसे किलोवरून ५० पैसे किलोपर्यंत चढली. कांहीं ठिकाणीं तर लोकांना १ रुपया किलोनें मीठ घ्यावें लागलें.

## सांगलीच्या अर्बन बँकेस जिल्हा न्यायाधिशांची भेट

### श्री. म. ह. गोडबोले ह्यांचें उद्‌बोधक भाषण

अर्बन को. बँक लि., सांगली, ह्या बँकेस सांगलीचे जिल्हा न्यायाधीश श्री. शिंपी ह्यांनीं २६-८-६४रोजीं भेट दिली. त्या वेळीं आभारप्रदर्शनाचें भाषण सुप्रसिद्ध सहकारी कार्यकर्ते, बँकेचे एक संस्थापक, अनेक वर्षें कार्याध्यक्ष आणि हल्लींच्या व्यवस्थापक मंडळाचे एक सदस्य, श्री. म. ह. गोडबोले, ह्यांनीं केलें. ते आपल्या भाषणांत म्हणाले :—

आपल्या जवळच्या कराड अर्बन बँकेवरून आम्ही स्फूर्ति घेतली. आरंभीं रु. अकराशेच्या भांडवलावर या बँकेच्या कामकाजास सुरुवात झाली. आरंभींच्या कालांत एखाद्या दिवशीं शंभर रुपयांची जरी नवी ठेव आली तरी त्या वेळीं मला व माझ्या सहकाऱ्यांना आनंद होत असे. त्या वेळीं सांगलीच्या नागरिकांनींहि आमच्यावर विश्वास ठेवून प्रोत्साहन दिलें. श्री. वा. ग. अभ्यंकर या सेवानिवृत्त नागरिकांनीं त्यांना मिळालेल्या ग्रॅज्युएटीची सर्वच्या सर्व रु. ३,५००-०० ची रक्कम आमचेकडे ठेवली. ही रक्कम आज लहान दिसली तरी त्या वेळच्या परिस्थितींत तिचें फार महत्त्व होतें. आतां बँकेनें सर्व दृष्टींनें प्रगती केली आहे. हल्लीं बँकेच्या व्यवस्थापक मंडळाचा मी सभासद असलों तरी दैनंदिन व्यवहारांशीं माझा संबंध कमी आहे. आपल्यास सांगणेस अभिमान वाटतो कीं, ही बँक महाराष्ट्र राज्यांतील, मुंबईमधील अर्बन बँका सोडल्यास, दुसऱ्या क्रमांकाची आहे. हें जसें सांगली शहरास भूषणावह आहे तीच गोष्ट एकंदर बँकिंगबद्दलहि आहे. सबंध भारतात बँकिंग व्यवसायाचा विकास व कार्यक्षमता या बाबतींत सांगली शहराचा अग्रक्रमांक आहे.

अर्बन बँकेप्रमाणें इतर सहकारी संस्थांशींहि मी संबंधित आहें. महाराष्ट्र राज्यांतील को-ऑपरेटिव्ह बँकस् असोसिएशनच्या अर्बन बँकांच्या बोर्ड ऑफ रिप्रेझेन्टेटिव्हिज्‌चा मी हल्लीं चेअरमन आहें. सहकारी संस्थांमध्यें होत असलेल्या गैरव्यवहाराबद्दलच्या बातम्या ऐकून सहकारी तत्त्वप्रणाली व कार्यपद्धति यांबद्दल आपण गैरसमज करून घेऊं नये. अशा समजुतीमुळें आपल्यासारखा सुशिक्षित वर्ग या सहकारी क्षेत्रापासून दूर राहात आहे. आपण तसें दूर राहणें इष्ट नाहीं. जनतेंत शिक्षणाची वाढ होईपर्यंत या गोष्टी झाल्या तरी त्यामुळें नाउमेद होऊन चालणार नाहीं. सहकारी- पद्धती हीच आपल्या आर्थिक रचनेंत यशस्वी होणार आहे. माणसांमध्यें असलेल्या सुप्त कार्यक्षमतेस उत्तेजन व वाव दिल्यावर त्याच्या हातून कशाप्रकारचें कार्य होऊं शकतें याचें महाराष्ट्र सहकारी बँकेचे पूर्वीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. लाड यांनीं या बँकेस भेट दिल्यावेळीं उदाहरण सांगितलें आहे.


याच अनुरोधानें आपणांस सांगण्यास हरकत नाहीं कीं १९४८ सालच्या आपत्तींत बँकेनें आपद्ग्रस्त सभासदांना रु. दीड लाख पर्यंत ३ टक्के व्याजानें कर्ज देऊन धंदा पुन्हां चालू करणेस बहुमोल साहाय्य केलेलें आहे. सुरत येथें तापी नदीच्या झालेल्या प्रलयकाळींहि तेथील बँकांनींच साहाय्य केलें. ३-४ वर्षें पानशेत धरणफुटीमुळें झालेल्या आपद्प्रसंगींहि पुण्याच्या ३-४ सहकारी बँकाच सहकार्याकरितां पुढें आल्या. सांगलींत ज्यावेळीं अर्बन बँकेनें आपद्ग्रस्त लोकांना साहाय्य दिलें त्याच वेळीं सांगली येथील कांहीं बँकांनीं पूर्वी मंजूर केलेली कर्जदारांची कर्जमर्यादाहि तहकूब ठेविली.



आपल्या सहकारी चळवळीस बरेंच क्षेत्र गांठणेचें आहे. इंग्लंड, स्वित्झर्लंड, वगैरे युरोपिअन राष्ट्रांनीं या बाबतींत बरीच प्रगति केलेली आहे. आपणहि अशीच प्रगति करूं असा या बँकेच्या प्रगतीवरून व अनुभवावरून मला विश्वास वाटतो.

सरदारगृह
मुंबईंत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.
— आमचीं वैशिष्ट्यें —
* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्म-शताब्दी दिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.
फोन नं. :-३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार-सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!
सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

| | | | |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ... | रु. | १० लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... | रु. | १५ ,, |
| ठेवी | ... | रु. | ४१४ ,, |
| खेळतें भांडवल | ... | रु. | ४५० ,, |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणें व बेळगांव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकद्वरी लेन, मुंबई ४.

स्थापना १९१८

महाराष्ट्र सरकारनें तगाईवर मंजूर केलेले "विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग

तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्

विजय पंपिंग सेट
१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्ट कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट इ. इ.
— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

# अर्थ

बुधवार, १६ सप्टेंबर, १९६४



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## मुंबईमधील क्षयरोगाचा प्रसार

औद्योगिक युगांत प्रवेश करणाऱ्या कोणत्याहि देशांत मोठी शहरें अस्तित्वांत येण्याची प्रवृत्ति दिसून येते. अलीकडे उद्योगधंद्यांचें विकेंद्रीकरण करून कृषि-औद्योगिक वसाहती स्थापन करण्याची कल्पना मूळ धरू लागली आहे. परंतु दरम्यानच्या कालांत मोठ्या शहरांची लोकसंख्या फुगत चालली असून त्यामुळें अनेक प्रकारचे प्रश्न नव्यानें उपस्थित होत आहेत. अवाढव्य शहरांतील आरोग्याचा प्रश्न हा अशापैकींच एक आहे. मुंबई कॉर्पोरेशनच्या वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्य कमिटीनें केलेल्या पहाणीवरून शहरांतील क्षयरोगाच्या प्रसाराबद्दल उद्‌बोधक माहिती मिळाली आहे. समितीनें केलेल्या अंदाजाप्रमाणें मुंबईतील लोकांत दर १०० जणांमागें २ जण क्षयरोगानें पछाडलेले असतात. बृहन् मुंबईत फुफ्फुसाच्या क्षयरोगाची बाधा झालेल्या लोकांची संख्या सुमारें ८० हजाराच्या आसपास आहे आणि त्यामधील २० हजार रोगी संसर्गजन्य क्षयरोगाची बाधा झालेले आहेत. मुंबईतील गिरण्याकारखान्यांतून राबणारे मजूर, मध्यमवर्गीय लोक आणि अपुऱ्या जागेंत दाटीवाटीनें राहणाऱ्या लोकांत ह्या रोगाचा प्रादुर्भाव अधिक प्रमाणांत आढळून येतो. क्षयरोगाचा प्रसार थांबविण्यासाठी कार्पोरेशननें अनेक उपाय सुचविले आहेत. मुंबईच्या दोन उपनगरांत क्षयरोग्यासाठी दोन स्वतंत्र इस्पितळें स्थापन करण्यांत यावींत आणि त्या प्रत्येकांत १ हजार रोग्यांची सोय करण्यांत यावी असा एक उपाय सुचविण्यांत आला आहे. मोठ्या शहरांतील आरोग्य बिघडण्यास अनेक कारणें असलीं तरी गर्दीनें व दाटीनें राहणाऱ्यांची मोठी संख्या हें प्रमुख कारण म्हणावें लागेल. ह्या कारणाचें निर्मूलन केल्याशिवाय आरोग्याचा प्रश्न समाधानपूर्वक सुटणें कठीण जाईल.

## मच्छीमारीच्या धंद्याला मदत देण्याची तयारी

हिंदमधील अन्नधान्याच्या टंचाईला तोंड देण्यासाठी अनेक उपाय सुचविण्यांत येत असतात. अशा उपायांत समुद्रापासून मासे आणि इतर जलज अन्न मिळविण्याच्या प्रयत्नांकडेहि बोट दाखविलें जातें. समुद्रापासून माणसाला कितीतरी खाद्यपदार्थ मिळूं शकतील असें तज्ज्ञांचें मत आहे. ह्या दृष्टीनें आइसलँड ह्या छोट्या देशानें भारताला देऊं केलेली मदत मोलाची आहे. भारताच्या मानानें आइसलँड हा देश अगदींच छोटा असला तरी तो मच्छीमारीच्या व जलज अन्नपदार्थांच्या निर्मितीच्या बाबतींत पुढारलेल्या देशांपैकी एक गणला जातो. शिवाय ह्या धंद्यांतील आधुनिक तंत्रहि त्यानें आत्मसात केलेलें आहे. मच्छीमारीच्या धंद्याचा विकास करण्यासाठी आइसलँडनें भारताला तांत्रिक व आर्थिक साह्य देण्याची तयारी दाखविली आहे. ह्यासंबंधींची योजना भारत सरकारनें तयार करून ती आइसलँडच्या सरकारकडे तपासणीसाठी पाठवावयाची आहे. तपासणी पूर्ण झाल्यावर आइसलँडचें सरकार कोणत्या प्रकारें आर्थिक मदत द्यावी व ती किती द्यावी ह्यासंबंधीं निर्णय घेणार आहे. आइसलँडमध्यें मच्छीमारीचा आणि गोठवलेल्या अन्नाचा धंदा करणाऱ्या कंपन्यांच्या कांहीं प्रतिनिधींना भारतांत बोलावण्यांत येणार आहे. हा धंदा चालविण्यासाठी भारतांतील समुद्रकिनाऱ्यावर एखादी सोयीस्कर जागा निवडण्यांत आल्यावर आइसलँडकडून मिळणारी मदत एखाद्या हिंदी संघटनेला देण्यांत येईल. ही संस्था आइसलँडमधील व्यापारी संघटनांच्या सहकार्यानें ह्या नव्या धंद्यांत पदार्पण करील.

## दक्षिण अमेरिकेंतील देशांत निर्यातीला वाव

दक्षिण अमेरिकेंतील देशांत भारताला माल निर्यात करण्यास कितपत वाव आहे हें अजमावण्यासाठी एक व्यापारी प्रतिनिधिमंडळ तिकडे अधिकृतरीत्या पाठविण्यांत आलें होतें. भारतामधून ह्या देशांना माल निर्यात करण्यास भरपूर क्षेत्र उपलब्ध आहे असा अभिप्राय मंडळानें व्यक्त केला आहे. तागाचा माल निर्यात करण्यास बोलिव्हिआ, व्हेनेझुएआला, कोलंबिआ आणि अर्जेंटायना ह्या देशांतील बाजारपेठ उपलब्ध होऊं शकेल. कापडासारख्या रोजखपाच्या वस्तू ब्राझिल, पेरू, इत्यादि देशांतून निर्यात करतां येण्यासारख्या आहेत. व्हेनेझुएआला ह्या देशानें भारतामधील रेशीम, हस्तोद्योगाच्या वस्तू, खेळाचें सामान, उत्तम प्रतीचें कापड, घरांत वापरतां येण्यासारखीं यांत्रिक व हातानें चालविण्याचीं उपकरणें इत्यादि मालाबाबत बरीच आस्था दाखविली आहे. दक्षिण अमेरिकेंतील कांहीं देशांनीं चहा आणि तागाच्या गिरण्यांची यंत्रसामग्री ह्यांच्याबद्दलहि चौकशी केली आहे. एंजिनिअरिंग उद्योगधंद्यांच्या मालाविषयीं कांहीं देशांनीं विचारणा केली आहे. मात्र, निर्यात केलेल्या यांत्रिक साधनांची निगा राखण्यासाठी जी व्यवस्था लागते, ती करण्यांत आली पाहिजे. भारत व दक्षिण अमेरिका ह्यांच्यांतील व्यापारांत भारताकडे व्यापाराची अनुकूल तफावत झुकते. ह्या देशांकडून भारत दरसाल सुमारें ४ कोटी रुपये किमतीच्या मालाची आयात करतो आणि निर्यात मात्र १७ कोटी रुपये किमतीच्या मालाची करतो. निर्यात वाढविण्यास अद्याप पुष्कळच जागाहि आहे. ब्राझिलकडून भारताला बोटी बांधून मिळण्याची शक्यता आहे. भारताच्या भांडवली स्वरूपाच्या मालालाहि ह्या देशांतून मागणी येण्यासारखी आहे.

## रेल्वेला मदत देण्यास नवी कसोटी?

हिंदमधील रेल्वेच्या विकासाला मदत देण्याच्या कामीं जागतिक बँक नवी कसोटी लावणार असल्याचें वृत्त आहे. १९६४–६५ सालांतील रेल्वे विकासाच्या कामासाठी बँकेकडून ६ कोटी डॉलर्सचें कर्ज मिळविण्याच्या वाटाघाटी चालू आहेत. रेल्वेंत गुंतविल्या जाणाऱ्या भांडवलावर योग्य तितका नफा सुटतो कीं नाहीं एवढ्या एकाच दृष्टीनें आतां बँक विचार करणार नाहीं. हेंच भांडवल इतर कोणत्यातरी उद्योगधंद्यांत गुंतविलें तर त्यापासून मिळूं शकणाऱ्या नफ्याचाहि ह्यापुढें विचार करण्यांत येणार आहे. ह्याचा अर्थ असा कीं, इतर विकासांच्या कामासाठी लागणाऱ्या मदतीची स्पर्धा आतां रेल्वेला जाणविण्याची शक्यता आहे. शिवाय, रेल्वेच्या विकासाच्या कामावर होणाऱ्या खर्चाचा समाजाला किती फायदा होईल, हेंहि पाहिलें जाईल.

**यांत्रिक हत्यारांचा कारखाना**—सार्वजनिक विभागांत काढण्यांत येत असलेला देशांतील यांत्रिक हत्यारांचा तिसरा कारखाना केरळ राज्यांत लवकरच उत्पादन करूं लागेल. ह्या कारखान्यांत दरसाल सुमारें ५ कोटी रुपयांची १ हजार यांत्रिक हत्यारें तयार करण्यांत येतील. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत त्याची उत्पादनक्षमता दुप्पट करण्यांत यावयाची आहे.

**बंगालसाठी खोबऱ्याचें तेल**—हिंदच्या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशननें सीलोनकडून २ हजार टन खोबऱ्याचें तेल आयात करण्याचें ठरविलें आहे. हें तेल मुख्यत: पश्चिम बंगालमध्यें पाठविण्यांत येईल. पश्चिम बंगालमध्यें मोहरीच्या तेलाची टंचाई भासत असल्यानें राज्यसरकार चिंताग्रस्त झालें आहे. तेलाचें वाटप वाजवी किंमतीच्या दुकानांतून करण्यांत येणार आहे.

**खेळाडूंना इषारा**—टोकिओ येथें भरविण्यांत येणाऱ्या ऑलिंपिक सामन्यावर नजर देऊन एका ब्रिटिश वैद्यकीय नियतकालिकानें खेळाडूंना स्पर्धा जिंकण्याच्या कामीं उत्तेजक पदार्थ घेण्याविरुद्ध इषारा दिला आहे. खेळांत वरचढपणा दाखविण्यास उपयोगी पडेल अशा प्रकारचा कोणताहि रासायनिक पदार्थ उपलब्ध झालेला नाहीं. असे पदार्थ घेतल्यानें उलट थोडा वाईटच परिणाम होतो, असें बजावण्यांत आलें आहे.

**जपानी उद्योगपतींचा दौरा**—जपानमधील उद्योगपतींची एक तुकडी सध्यां भारताचा दौरा करीत आहे. भारतामधील कांहीं उद्योगधंद्यांत जपानचें भांडवल गुंतविण्यास कितपत वाव आहे तें अजमावण्याचा त्यांचा इरादा आहे. भारत सरकारच्या व्यापार व उद्योगखात्याचे अधिकारी आणि इंडिअन इन्व्हेस्टमेंट सेंटर ह्यांच्याशीं ते वाटाघाटी करणार आहेत.

**खनिज इंधनाचा पुरवठा**—जिनिव्हा येथें अणुशक्तीचा शांततामय उपयोग करण्याच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी भरविण्यांत आलेल्या शास्त्रज्ञांच्या परिषदेंत भारताच्या अणुशक्ती-मंडळाचे अध्यक्ष श्री. भाभा ह्यांनीं एक प्रबंध सादर केला आहे. अविकसित देशांत अणुशक्तीच्या साह्यानें वीज उत्पन्न करण्याची अतिशय गरज आहे असा अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला आहे.

**आण्विक इंधनासाठी लागणारी वाळू**—भारतांत उभारलेल्या अणुशक्तीवरील वीजकेंद्रासाठी लागणारें आण्विक इंधन देशांतच तयार करतां येण्याची भरपूर शक्यता आहे. इंधनासाठी लागणारी मोनाझाइर वाळू भारतांत विपुल प्रमाणांत उपलब्ध आहे. समुद्रकिनाऱ्यावर आणि त्यालगतच्या समुद्राच्या तळावर असलेल्या वाळूपासून सुमारें ४ लाख ५० हजार टन थोरिआ इंधन तयार होऊं शकेल असा अंदाज हिंदी शास्त्रज्ञांनीं केला आहे.

प्रगतिचे ३० वें वर्ष



हे लक्ष्मीचे नवदेवालय
इथे श्रमांचा सुफलित संचय
उद्योगाचे उगमस्थान हे,
सौख्याचे संचित !
इथे हो सर्वांचे स्वागत !

बँक ऑफ महाराष्ट्र लि.
तुमची जिव्हाळ्याची बँक
आपल्या ९१ शाखांनिशीं तुमच्या सेवेस सिद्ध

# वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४५ ]

मुगभाट, मुंबई-४.

[ टेलिफोन ७२९००

बचतीच्या आकर्षक योजना

| | |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग | व्याजाचा दर ३॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | ,, ३॥ ,, |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | ,, ५ ,, |

मुदतीच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

## ओरिसा राज्यांतील आत्मघातांवर प्रकाश

आत्मघात हा नैतिक दृष्ट्या चूक आणि कायद्याच्या दृष्टीनें गुन्हा मानण्यांत आला असला तरी विफलतेची परमावधि झाल्यावर अनेक स्त्री-पुरुष हा सुटकेचा मार्ग स्वीकारतांना दिसतात. भौतिक सुखाच्या शिखरावर असणाऱ्या अमेरिकेंतसुद्धां धनिकांनाहि कधीं कधीं हा मार्ग पत्करावा लागतो. भारतांत गुजरात राज्यांत स्त्रियांच्या आत्मघाताचें प्रमाण अधिक असल्याचें प्रसिद्धच आहे. गुजरातमधील स्त्रियांच्या आत्मघाताला ह्या ना त्या कारणानें त्यांचा झालेला छळ कारणीभूत असतो असें दिसून आलेलें आहे. ओरिसा राज्यांत गेल्या वर्षी झालेल्या आत्मघाताच्या प्रकारांची तऱ्हा जरा वेगळी आहे. गेल्या वर्षी ओरिसा राज्यांत १,११० लोकांनीं आपल्या जीवनाचा शेवट करून घेतला. ह्या आत्मघातासंबंधींचा तपशील कांहींसा उद्बोधक आहे. असाध्य आणि दीर्घकालीन दुखण्यांनीं अगर रोगांनीं बेजार झाल्यामुळें ४४६ लोकांनीं मरणाची वाट पत्करली, घरांतील भांडणें आणि असंतोष ह्यांच्या पायीं ४१७ लोकांनीं परलोकाचा मार्ग स्वीकारला, ४१ जणांनीं आर्थिक दुरावस्थेमुळें आत्मघात करून घेतला, परीक्षेंतील अपयशामुळें ५ जणांनीं मृत्यूला कवटाळलें आणि प्रेमभंगामुळें ५५ जणांनीं आयुष्याचें भरतवाक्य म्हटलें. दुर्धर व असाध्य रोगांनीं दीर्घकाल पाठपुरावा केल्यामुळें आत्महत्त्या केलेल्यांचा आंकडा सर्वांत अधिक आहे. ह्या दुर्दैवी लोकांची आर्थिक परिस्थिति बेताची असल्यामुळें त्यांना आधुनिक उपचार करतां आले नाहींत किंवा काय, अशी शंका येण्यासारखी आहे. त्यांच्या आर्थिक आवाक्यांतील सर्व उपाय त्यांनीं केले असतील असें समजण्यास हरकत नाहीं. तरीसुद्धां वैद्यकीय उपचारांच्या अपुरेपणामुळें झालेले हे आत्मघात सामाजिक दृष्ट्या चिंतनीय ठरतात ह्यांत शंका नाहीं.

## झेकोस्लोव्हाकिआंतील प्रदर्शनांत भारताचें दालन

झेकोस्लोव्हाकिआंत ब्रनो येथें भरविण्यांत आलेल्या आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शनांत भारतानें प्रथमच आणि तोहि मोठ्या प्रमाणावर भाग घेतला होता. सुमारें ८० हिंदी कंपन्यांनीं प्रदर्शनांत आपलीं दालनें उघडलीं होतीं. ह्या कंपन्यांत लेथस्, ड्रिलिंग मशीन्स, इलेक्ट्रिक मोटारी, कापड गिरण्यांची यंत्रसामग्री, शिवणाचीं यंत्रें, विजेचे पंखे, इत्यादि माल बनविणाऱ्या कंपन्या होत्या. प्रदर्शनाच्या तांत्रिक विभागांत हिंदी माल त्याच्या प्रकाराप्रमाणें वेगवेगळा मांडून ठेवण्यांत आला होता. बिगर-एंजिनिअरिंगचा माल वेगळ्या ठिकाणीं मांडण्यांत आला होता. प्रदर्शनाच्या तंत्रविषयक विभागांत भारतानें ४७५ चौरस मीटर जागा घेतली होती आणि बिगर तांत्रिक विभागांत २०० चौरस मीटर जागा घेतली होती. बिगर तांत्रिक दालनांत अनेक प्रकारचा माल मांडण्यांत आला होता. त्यांत टायर्स, ड्राय बॅटऱ्या, रॉकेलवर जळणारे दिवे व स्टोव्हस, दाढी करण्याचीं पातीं, अल्युमिनमचीं भांडीं, नॉयलानच्या विणलेल्या वस्तू, इत्यादि माल होता. ह्याशिवाय प्रदर्शनांत रोजखपाच्या कांहीं वस्तूहि ठेवण्यांत आल्या होत्या. त्यांत चहा, कॉफी, तंबाखू, हवाबंद फळांचे डबे, काजू, रेशमाच्या व रेयॉनच्या वस्तू, फळांचे रस इत्यादि वस्तू होत्या. ह्यांपैकी कांहीं वस्तूंची विक्रीहि करण्यांत येत होती. प्रदर्शनांत भारतामधील अनेक प्रकारचा माल झेक नागरिकांना प्रत्यक्ष पाहावयास मिळाला. हिंदी मालाविषयीं कल्पना आल्यामुळें उभयता देशामधील व्यापाराची वृद्धि होईल अशी अपेक्षा करण्यांत येत आहे. झेकोस्लोव्हाकिआ भारताकडून कांहीं पक्का व अर्धपक्का माल घेण्यास तयार आहे.

## अणुशक्तीच्या साह्यानें चालणारे कारखाने

अणुबाँबच्या स्फोटक शक्तीमुळें अणुशक्तीविषयीं एक प्रकारची भीति सर्व जगभर पसरलेली आहे. अणुशक्तीचा उपयोग करून वीजकेंद्रें उभारण्यांत आलेलें यशहि आतां परिचयाचें झालें आहे. परंतु अणुशक्तीच्या उपयोगानें चालणाऱ्या कारखान्यांबद्दल धोक्याची भावना सामान्यत: आढळून येते. अशा कारखान्यांतून धोका टाळण्यासाठी जी दक्षता घेण्यांत येते तीमुळें ह्या भावनेला पाठिंबाच मिळतो. परंतु जिनीव्हा येथें अणुशक्तीच्या शांततामय उपयोगाविषयीं जी आंतरराष्ट्रीय परिषद् भरविण्यांत आली होती तींत सादर करण्यांत आलेल्या प्रबंधावरून अणुशक्तीचलित कारखान्यांत काम करणाऱ्या लोकांना अत्यल्प धोका असतो, असें दिसून आलें आहे. ह्या बाबतींत अमेरिका आणि रशिआ ह्या दोन्ही देशांतील कारखान्यांचा अनुभव सारखाच आहे. अमेरिकेंत काय किंवा रशिआंत काय, अणुशक्तीचलित कारखान्यांतून होणाऱ्या अपघातांचें प्रमाण फारच कमी आहे. रासायनिक कारखाने, कापडगिरण्या, खनिज धातूंचे कारखाने, इत्यादि उद्योगधंदे अणुशक्तीवर चालणाऱ्या कारखान्यांपेक्षा जुने आहेत. परंतु रशिआंत तरी असें आढळून आलें आहे कीं ह्या जुन्या उद्योगधंद्यांतून होणाऱ्या अपघातांची संख्या अणुशक्तीवर चालणाऱ्या कारखान्यांत होणाऱ्या अपघातांपेक्षा बरीच जास्त आहे. अणुशक्तीच्या वापरांत घेण्यात येणाऱ्या दक्षतेचा आणि कारखान्यांत काम करणारांच्या मनांत अणुशक्तीविषयीं असणाऱ्या सुप्त भीतीचाहि हा परिणाम असूं शकेल. भारतांत अणुशक्तीचा वापर हळूहळू वाढत्या प्रमाणावर होऊं लागणार असल्यानें ह्या बाबतींत इतर देशांच्या अनुभवाचा फायदा मिळूं शकेल. कारण अणुविज्ञानाचें तंत्र व मंत्र भारताला अजून खूपच शिकावयाचें आहे.

## उत्पन्नांतील विषमता दूर करण्यावर भर

टोकिओ येथें आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक आणि इतर संबंधित द्रव्यविषयक संघटना ह्यांच्या वार्षिक सभा भरविण्यांत आल्या होत्या. ह्या सभांना हजर राहण्यासाठी इंडस्ट्रिअल क्रेडिट अँड इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिआ ह्या संघटनेचे अध्यक्ष श्री. जी. एल. मेहता गेले होते. आंतरराष्ट्रीय आर्थिक संघटनांकडून अविकसित देशांना मिळणाऱ्या मदतीसंबंधी त्यांनीं कांहीं महत्त्वाचे विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणाले कीं, सध्यां प्रगत देश आणि विकसनशील देश ह्यांच्या उत्पन्नांत मोठी तफावत आहे. ही तफावत नाहींशी कशी करतां येईल हा आंतरराष्ट्रीय आर्थिक मदत संघटनांसमोर असणारा प्रमुख प्रश्न आहे. आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेंतील उत्पन्नाच्या विषमतेची ही समस्या आज मुलगामी स्वरूपाची झालेली आहे. सध्यांच्या जगापुढें हाच काय तो मूलभूत प्रश्न आहे; कम्युनिझम अगर वसाहतवाद ह्यांना तोंड देण्याचा नाहीं. भारतासारख्या विकास साधू इच्छिणाऱ्या देशांना विकास साधण्यासाठी पुरेशा मदतीची आवश्यकता तर आहेच; त्याचबरोबर भारत स्वतः उत्पन्नांतील प्रचलित विषमता दूर करण्याच्या प्रयत्नास हातभार लावण्यासहि तयार आहे. अलीकडे आशियांतील व आफ्रिकेंतील बऱ्याच देशांना नव्यानें राजकीय स्वातंत्र्य मिळालें आहे. पण, आर्थिक विकास आणि वाढ प्राप्त करून घेतल्याशिवाय ह्या राजकीय स्वातंत्र्याला कांहीं अर्थ राहणार नाहीं. भारतासारख्या देशांना आंतरराष्ट्रीय देण्याघेण्याच्या व्यवहारांत समतोल राखणें अवघड जात आहे. पण हा समतोल बिघडण्याचें कारण त्यांच्या विकासाच्या प्रयत्नांतच सांपडणारें आहे. दीर्घ कालपर्यंत प्रवाही राहणाऱ्या भांडवलाच्या ओघाची भारतासारख्या देशांना आज तांतडीची गरज आहे.

### दि महाराष्ट्र स्टेट को. बँक लि०

अहवालाचे वर्षीं बँकेच्या भरपाई झालेल्या भांडवलांत २७·९१ लक्ष रु. ची भर पडून तें ४८४·२१ लक्ष रु. झालें. रिझर्व्ह आणि अन्य निधींची रक्कम १२६·९१ लक्ष रु. चीं १३०·९३ लक्ष रु. झाली. ठेवींत ५१६·६० लक्ष रु. ची भर पडून तिची रक्कम ३५२९·७५ लक्ष रु. झाली. रिझर्व्ह बँकेचीं कर्जें २५४२ लक्ष रु. चीं आहेत. बँकेनें दिलेलीं कर्जें ४४३३·४६ लक्ष रु. होतीं. एकूण नफा ३८·३० लक्ष रु. उरला. अंधेरी, माहीम, माटुंगा व शीव ह्या चार ठिकाणीं नवीन शाखा काढण्यांत आल्या. "रीफायनान्स कॉर्पोरेशन फॉर इंडस्ट्री" याजकडून मिळूं शकणाऱ्या सर्व सवलतींचा पुरेपूर फायदा घेण्यांत येतो. त्याकडून घेण्यांत आलेल्या कर्जाची ३० जून १९६४ अखेरची रक्कम १४४ लक्ष रु. आहे. ( अध्यक्ष : ध. रा. गाडगीळ, उपाध्यक्ष : वा. तु. वसू, जनरल मॅनेजर : वि. म. जोगळेकर ).

### दि इचलकरंजी अ. को. बँक लि०

बँकेच्या नवीन इमारतीचें उद्घाटन नामदार केशवराव सिताराम सोनवणे, सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य, ह्यांच्या हस्तें शनिवार. दि. १२ सप्टेंबर १९६४ रोजीं झालें.

### वैश्य को. बँक लि., मुंबई.

वृत्तांत वर्षीं सभासद–संख्या १३३६ ची १३९१ झाली; भाग-भांडवल १,२२,०४० रु. चें १,३२,७२० रु. झालें; खेळतें भांडवल ८,६६,९६३ रु. वरून ९,६१,८१६ रु. वर गेलें. सहकारी बँकांवरील परस्पर ड्राफ्ट योजनेंत बँक सहभागी झाली असून त्यासाठी आवश्यक कायम ठेव गुंतवणूक तिनें महाराष्ट्र स्टेट को. बँकेंत केली आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी संघाकडून बँकेस २०० रु. चें पारितोषिक मिळालें आहे. अहवालाचे वर्षीं बँकेस ११·६७४ रु. निव्वळ नफा झाला. बँकेनें रोख, बँकांत आणि इन्व्हेस्टमेंटमध्यें असे सुमारें ६½ लक्ष रु. तरते ठेवलें आहेत आणि ३ लक्ष रु. चीं कर्जें दिलीं आहेत. बँक अशा रीतीनें मजबुती आणि तरतेपणा राखून सभासदांची जास्तींत जास्त सेवा करीत आहे.

( अध्यक्ष : रामकृष्ण रामचंद्र टाकळे, उपाध्यक्ष : सखाराम गोपाळ शेटये, सन्मा. कार्यवाह : गजानन शंकर चिखले, सहकार्यवाह : महादेव वासुदेव शेटये )


## आपण आपला धान्यसाठा जाहीर केला आहे काय ?

जर केला नसेल तर आपणाजवळ २० सप्टेंबर १९६४ रोजीं असलेला धान्यसाठा दोन दिवसांत म्हणजे २२ सप्टेंबर १९६४ चे आंत जवळच्या मुलकी अधिकाऱ्याकडे जाहीर करा.

आपण शेतकरी नसाल व आपणाजवळ १० क्विंटलपेक्षा अधिक साठा असेल तर तो आपणास जाहीर करावयाचा आहे.

शेतकरी असाल तर २५ क्विंटलपेक्षा जास्त धान्यसाठा असल्यास तो जाहीर करा.

२२ सप्टेंबर १९६४ ही मुद्दाम वाढविलेली मुदत आहे. तिचा फायदा घेऊन तावडतोब आपापल्याजवळील धान्यसाठा जाहीर करा. या धान्यसाठ्यात तांदूळ, गहूं, ज्वारी, बाजरी हीं अन्नधान्यें अथवा त्यांचें पीठ यांचा समावेश होतो.

**साठा जाहीर करणें देशकार्य आहे आणि न करणें भारत संरक्षण अधिनियमाप्रमाणें गुन्हा आहे.**



दातांच्या स्वच्छतेसाठी

★ **माकडछाप** म्हणजेच **काळी टूथ पावडर** ★

## बँकेनें पोलिस स्टेशनांत ठेवलेली कॅशबॉक्स

### चोरीस गेली, तर सरकारवर जबाबदारी नाहीं

दि बिलासपूर सेंट्रल को. बँकेची पेन्द्रा रोड येथें एक शाखा होती. शाखेची कॅश ठेवण्यासाठी स्ट्राँगरूमची सोय नसल्यामुळें ती कॅश पेन्द्रा रोडच्या पोलिस स्टेशनमध्यें ठेवण्यांत येत असे. १२ एप्रिल, १९५६ रोजीं पोलिस स्टेशनचें मागचें दार उघडें असून आंतील कॅशची पेटी नाहीं, असें आढळून आलें. पोलिसांनीं तपास केला तरी त्यांतून कांहींच निष्पन्न झालें नाहीं. कॅश-बॉक्समध्यें असलेले ४६,९४६ रु. मिळण्याचा हुकूमनामा मागणारा दावा बँकेनें मध्य-प्रदेश सरकारच्या विरुद्ध लावला. कॅश-बॉक्समधील पैसा जनतेचा पैसा होता, बँक हें सरकारचेंच खातें होतें, इन्स्पेक्टर जनरलशीं बँकेनें केलेल्या व्यवस्थेप्रमाणें त्यानें कॅशबॉक्स सांभाळण्याचें मान्य केलेलें होतें, तेव्हां राज्य सरकार बॉक्समधील पैसे देण्यास बांधलेलें आहे, असें बँकेचें म्हणणें होतें.

"योग्य ती दक्षता घेण्याचे बाबतींत पोलिस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनीं हयगय केली असा पुरावा असला, तरी बँकेची कॅश-बॉक्स पोलिस स्टेशनमध्यें ठेवून घेण्याचे बाबतींत इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलिस आपल्या अधिकारांत वागला असें म्हणतां येणार नाहीं. राज्य सरकारचे वतीनें एखादा माल सांभाळण्यास घेण्याचा इन्स्पेक्टर जनरल हा एजंट नव्हे." असें सुप्रीम कोर्टानें नमूद करून मध्यप्रदेश सरकारचें अपील मंजूर केलें. मध्यप्रदेश हाय-कोर्टानें बँकेच्या बाजूनें निवाडा केला होता, तर प्राथमिक कोर्टानें बँकेविरुद्ध निकाल दिला होता. म्हणजे, प्राथमिक कोर्टाचा निकाल अखेर कायदेशीर बंधनकारक ठरला.

---

## भारतांतील ७० लक्ष शाळकरी मुलांना अमेरिकन दूधभुकटीचें दूध

### पुण्यांत दररोज ५,००० बालकांना लाभ मिळणार

शनिवार ५ सप्टेंबर रोजीं पुणें नगरपालिका व "केअर" संस्था यांच्या सहकार्यानें नगरपालिकेच्या प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांना दूध देण्याच्या योजनेचें उद्घाटन झालें. या योजने-प्रमाणें दररोज ५,००० विद्यार्थ्यांना प्रत्येकीं एक बाटली (एक पंचमांश लिटर) दूध दिलें जाईल.

"केअर" संस्थेमार्फत अमेरिकन लोकांनीं दिलेल्या दूधभुकटी-पासून दूध तयार करण्याचें काम महाराष्ट्र सरकारच्या "पुणें दूध केंद्रां"त केलें जाईल. हें दूध विद्यार्थ्यांना दररोज सकाळच्या सुट्टींत दिलें जाईल. या योजनेची व्यवस्था पुणें नगरपालिका व "केअर" संस्था यांच्या सहकार्यानें केली जाईल.

मुंबई नगरपालिका व "केअर" संस्था यांच्या सहकार्यानें मुंबईत ६ फेब्रुवारी १९६३ रोजीं दूध-योजना सुरू झाली. त्या योजनेप्रमाणें सध्यां मुंबईतील २,००,००० प्राथमिक विद्यार्थ्यांना दररोज एक बाटली दूध मिळत आहे. मुंबई शहर, पंजाब, राज-स्थान, मद्रास, केरळ, आंध्र प्रदेश व म्हैसूर येथें "केअर" संस्थेच्या योजनेप्रमाणें दररोज एकंदर ७० लक्ष शाळकरी मुलां-मुलींना दूध दिलें जात आहे.

---

### सांगली म्यु. सर्व्हंट्स को. क्रे. सोसायटी लि.

अहवालाचे सालीं शेअर भांडवल रु. ५,९५० नें वाढलें असून कर्ज येणें मध्यें रु. ९,६९९ ची वाढ झाली आहे. खेळतें भांडवलहि वाढून तें आतां रु.९८,०१७ झालें. सोसायटीस निव्वळ नफा रु. ४,९८८ झाला. ६% डिव्हिडंड देण्यांत येईल.

चेअरमन : राजाराम ज्ञानू भांडवले. व्हा. चेअरमन : गजानन विठ्ठल देसाई.

## सहकारी कागद गिरणी प्रवर्तक जागतिक दौऱ्यावर जाणार

नियोजित भारत सहकारी कागद गिरणीच्या वतीनें एक शिष्ट-मंडळ ता. २५ सप्टेंबर रोजीं जगाच्या दौऱ्यावर जाणार आहे.

हा सहकारी कारखाना सांगलीचा शेतकरी सह. साखर कारखाना आणि कोल्हापूर जिल्ह्यांतील पंचगंगा व वारणा तसेंच कराडचा कृष्णा या सहकारी साखर कारखान्यांच्या वतीनें काढण्यांत येणार आहे. त्याला १२ कोटी रुपये खर्च येणार असून त्याची रोजची उत्पादनक्षमता १००० टन वृत्तपत्रीय कागद व वार्षिक ३० हजार टन लिहिण्याचा कागद इतकी राहाणार आहे.

निरनिराळ्या देशांत उसाच्या चिपाडापासून कागद तयार कर-ण्याचे कारखाने आहेत. त्यांची यंत्रसामग्री व कार्यपद्धती पाहाण्या-साठी हा दौरा आंखण्यांत आला आहे.

रिझर्व्ह बँकेनें या दौऱ्यासाठी परकी चलन उपलब्ध करून देण्याचें मान्य केलें आहे. प. जर्मनी, फ्रान्स, ब्रिटन, कॅनडा, अमेरिका, मेक्सिको, फिलिपाईन्स, जपान वगैरे देशांत हें शिष्ट-मंडळ भेट देणार आहे. अमेरिकेंतील शेती पाहाणीसाठी अमेरिकन सरकारनें आमंत्रण दिलेलें असल्यानें या शिष्टमंडळाचा दौरा दहा दिवसांनीं वाढण्याचा संभव आहे.

या पाहणी दौऱ्यासाठी जाणाऱ्या शिष्टमंडळांत आम. वसंतराव पाटील, आम. रत्नाप्पा कुंभार, श्री. तात्यासाहेब कोरे, श्री. जयवंत-राव भोसले, श्री. अप्पासाहेब खेबूडकर व महाराष्ट्र सरकारचा एक प्रतिनिधि यांचा समावेश आहे.

---

### सोन्याची आयात करण्याची सूचना

महाराष्ट्र सराफ असोसिएशनच्या कार्यकारी मंडळाची बैठक अकोला येथें भरविण्यांत आली होती. संघटनेचे चिटणीस श्री. महाजन सुवर्णनियंत्रणासंबंधीं बोलतांना म्हणाले कीं नियंत्रणाचा उद्देश असफल झाला असल्यामुळें तें रद्द करण्यांत यावे अशी संघटनेची मागणी आहे. भारतांत सुवर्ण आयात करण्याचे परवाने जर मोकळ्या हातानें देण्यांत आले तर सोन्याच्या किंमतींत ५० टक्के घट होईल. त्याशिवाय चोरट्या मार्गानें सोनें आयात कर-ण्याचा प्रकारहि आपोआप बंद पडेल. सोनें आयात करण्याविरुद्ध मुख्य आक्षेप आहे तो त्यामुळें परदेशीय चलन भारताबाहेर जाईल हा आहे. परंतु नियंत्रणामुळें चोरटी आयात जोंपर्यंत थांबत नाहीं तोंपर्यंत परदेशीय चलनाचा भारताबाहेर जाणारा ओघ थांबणार नाहीं हें लक्षांत घेतलें पाहिजे.

---

### डिझेल तेलावर चालणारें रेल्वे एंजिन

भारताचें रेल्वेबोर्ड ५ हजार अश्वशक्तीनें चालणारे डिझेल तेलावर चालणारे रेल्वे एंजिन तयार करण्याच्या प्रश्नाचा जारीनें विचार करीत आहे. पश्चिम जर्मनी आणि इतर युरोपीय देश ह्यांच्यांतील रेल्वे मार्गावर धांवणारी डिझेलवर चालणारी एंजिनें जास्तींत जास्त ४,८०० अश्वशक्तीची असतात. कांहीं वर्षांपूर्वी भारतामधील एका यंत्रज्ञानें एक शोध लावून रेल्वे एंजिनाची उप-लब्ध शक्ति वाढवितां येईल असें दाखवून दिलें होतें. नंतर ही नवीन युक्ति वापरून रेल्वे एंजिन तयार करण्याचे हक्क पश्चिम जर्मनीमधील एका कारखान्याला देण्यांत आले होते. ह्या कार-खान्याशीं रेल्वेबोर्ड सध्यां वाटाघाटी करीत आहे. नवीन युक्ति वापरून तयार केलेलें पहिलें एंजिन यशस्वी झाल्यास एवढ्या शक्तीचें डिझेल रेल्वे एंजिन वापरणारा भारत हा पहिलाच देश होईल.

## दि कराड अर्बन को. बँक लि.

वरील बँकेचें खेळतें भांडवल आतां ५५ लक्ष रु. झालें आहे. खेळत्या भांडवलाचें स्वतःच्या भांडवलाशीं प्रमाण १२·१९% असून ठेवी, इ.चें प्रमाण ८७·८१% आहे. कर्जाचें प्रमाण ४६·०९% आहे. अहवालाचे वर्षी ठेवींत ४,१५,००० रु.ची वाढ झाली. पुणें विभागांतील सहकारी बँकांच्या चालकांची सभा १५-२-६४ रोजीं बँकेच्या सभागृहांत भरविण्यांत आली होती तेव्हां ४० गांवांच्या बँकांचे १०० लोक उपस्थित होते. बँकेनें उभारलेल्या कृष्णा-कोयना इमारतींचें उद्‌घाटन दि. ७-१२-६३ रोजीं ना. यशवंतरावजी चव्हाण ह्यांच्या हस्तें झालें. ह्या दोन इमारतींत २८ ब्लॉक व दुकानें आहेत, त्यांच्या भाड्याच्या रूपानें बँकेस दरमहा ३,८९० रु. आवक होत आहे. बँकेची स्वल्पसंचय योजना यशस्वी होत आहे.

( चेअरमन : वि. कृ. तांबवेकर, बी. ए., एलएल. बी. मॅनेजिंग डायरेक्टर : शं. पु. कुलकर्णी. )

## दि जमखंडी अर्बन को. बँक लि.

भाग भांडवल, इतर ठेवी आणि खेळतें भांडवल ह्यांत वाढ झाली असून गतसालापर्यंत होत असलेली घट थांबून सर्वांगीण वाढीस आतां प्रारंभ झाला आहे. चालू वर्षी बँक रौप्यमहोत्सवी वर्षांत शुभदायक रीतीनें पदार्पण करीत आहे. रौप्यमहोत्सवासाठी ९,६६० रु. पर्यंत रक्कम खर्चण्यास साधारण सभेची संमति बोर्डानें मागितली आहे. अहवालाचे वर्षी बँकेस ९,७१२ रु. नफा झाला. बँकेच्या २८ लक्ष रु.च्या खेळत्या भांडवलापैकी ६ लक्ष रुपयांपेक्षा जास्त स्वतःचें भांडवल ( भाग भांडवल + रिझर्व्ह फंड + इतर रिझर्व्हज ) आहे, आणि सुमारें १७ लक्ष रु. तरते ( रोख, बँकांत; इनव्हेस्टमेंटमध्यें ) आहेत.

( चेअरमन : एस. एम. अथणी, व्हा. चेअरमन : एम. ए. शहा मॅनेजर : एम. डी. खाडिलकर )

## धुळें अर्बन को. बँक लि.

बँकेंतील सर्व प्रकारच्या ठेवींची रक्कम ५,५१,९१८ रु. झाली असून ती गतवर्षीपेक्षा १,२२,८०७ रु. नीं वाढली आहे. बँकेनें दिलेल्या कर्जाची येणे रक्कम ४,२५,४७३ रु. आहे. १० लक्ष रु. च्या खेळत्या भांडवलांत बँकेचं स्वतःचें भांडवल ३½ लक्ष रु. आहे. निव्वळ नफा ११,०६७ रु. झाला.

चेअरमन : अहमद कमाल सौदागर, व्हा. चेअरमन : भगवान नाना लोकर, मॅ. डायरेक्टर : नवीनचंद्र गो. शाह, मॅ. डायरेक्टर : सिकंदर अबदुल कादर

## पुणें पोस्टल को. बँक लि.

ह्या बँकेचें भाग भांडवल १,५४,६३५ रु. असून गंगाजळी २८,७७३ रु. ची आहे. काटकसर फंड १०,३९,६६२ रु. असून मुदत व बचत ठेवींत ८२,०२८ रु. आहेत. बँकेचें सभासदांकडून येणें १०,२१,३२५ रु. आहे. कर्जांत जास्त रक्कम गुंतविली आहे, ती कमी करावी अशी सहकारी खात्याची सूचना आहे. संचालक मंडळानें साल अखेरीस कुठल्याहि प्रकारें ओव्हरड्राफ्ट शिल्लक राहूं दिला नाहीं; १० हजार रु. कायम ठेवींत गुंतवले. बँकेस १६,६४९ रु. निव्वळ नफा झाला.

७·४०% डिव्हिडंड दिलें जाईल.

कार्याध्यक्ष : पी. सी. सहियार, उपकार्याध्यक्ष : एन. आर. भामे, सन्मान्य चिटणीस : बी. जी. आरेकर. )

## रशिअन अर्थव्यवस्थेंत नफ्याला स्थान

रशिआंतील अर्थव्यवस्थेंत नफ्याच्या प्रेरणेला स्थान देण्याचा प्रश्न ' प्रावदा ' ह्या वृत्तपत्रांत सुमारें एक महिन्यापूर्वी उपस्थित करण्यांत आला होता. अर्थव्यवस्थेंतील ह्या बदलाला रशिआच्या अॅकेडेमी ऑफ सायन्स ह्या संघटनेच्या एका प्रमुख सभासदानें पाठिंबा व्यक्त केला आहे. संभाव्य बदलासंबंधीं ' प्रावदा ' सारख्या प्रमुख पत्रांत चर्चा करण्यांत येत असल्यामुळें ह्या चर्चेला विरोध नसावा आणि रशिआच्या अर्थव्यवस्थेंत लवकरच कांहीं तरी मोठे बदल करण्यांत येण्याचा संभव असल्याचें ध्वनित करण्यांत येत आहे. मि. लिऑंटिव्ह ह्या अर्थशास्त्रज्ञानें ह्या प्रश्नासंबंधीं असें मत व्यक्त केलें आहे कीं उद्योगधंद्यांवर कारभाराच्या मार्गानें नियंत्रण ठेवण्याच्या ऐवजीं तें आर्थिक धोरणाच्या पद्धतीनें ठेवण्यांत आलें पाहिजे.

## अणुशक्तीजनित वीज स्वस्त पडेल

जिनीव्हा येथें भरविण्यांत आलेल्या आंतरराष्ट्रीय अणुशास्त्रज्ञांच्या परिषदेंत एका हिंदी शास्त्रज्ञानें असें मत व्यक्त केलें आहे कीं नेहमींच्या मार्गानें उभारण्यांत येणाऱ्या वीजकेंद्रांत निर्माण होणाऱ्या विजेपेक्षा अणुशक्तीच्या साह्यानें निर्माण करण्यांत येणारी वीज स्वस्त पडेल. ह्यासंबंधीं आकडेवार माहिती देतांना तो म्हणाला कीं भारतांत तारापूर येथें उभारण्यांत येणाऱ्या केंद्राला दर किलोवॅट मागें ३·०१ पैसे खर्च येईल. ह्याच ठिकाणीं कोळशाच्या साह्यानें वीज उत्पन्न करण्यांत आली तर त्यासाठी दर किलोवॅट मागें ४·०५ पैसे आणि तेलाच्या साह्यानें वीज निर्माण करण्यांत आली तर ५·४ पैसे खर्च येईल. अणुशक्तीवरील विजेच्या निर्मितीच्या तंत्रांत सुधारणा झाल्यामुळें हा फरक पडणार आहे.


**स्वस्तिकचा माल निर्यात होऊं लागला**

—: कांहीं बोलके आंकडे :—

| | |
|---|---|
| १९६३ सालांतील मालाची विक्री | रु. १ कोटी, २ लक्ष |
| १९६३ अखेर वसूल भाग-भांडवल | रु. ४३,८१,४८५ |
| कामगारांची संख्या | १,२०० चे वर |
| कारखान्याच्या बांधलेल्या जागेचें क्षेत्रफळ | १,१०,००० चौ. फू. |

— प्रमुख उत्पादनें —

गमबूट्स—होजपाईप्स—प्रेशर होजेस

ग्लोव्हज—इरेझर्स—ऑईल सील्स

व

स्वरूप केबल्स

**स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स लि.**

स्वस्तिक गृह, खडकी, पुणें ३.

( टेलिफोन नं. : ५५२०१ )


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.